## योजनाः -अल्पसंख्याक

### १.१ राज्य शासन अल्पसंख्याक योजना :-

शासन निर्णय दिनांक १४ मे, २०१४ नुसार राज्यातील ज्या ग्रामपंचायतीच्या एकुण लोकसंख्येपैकी अल्पसंख्याक समुहाची (मुस्लिम, ख्रिश्चन, शिख, बौध्द, जैन व पारसी) जनगणना २००१ च्या लोकसंख्या किमान १०० किंवा त्यापेक्षा जास्त आहे, अशा ग्रामपंचायतीना पुढील अनुज्ञेय पायाभुत सुविधांच्या उपलब्धतेसाठी शासनाकडुन सन २०१३-१४ या वर्षापासुन शासन उदिष्टानुसार प्रति ग्रामपंचायत कमाल रु.१० लक्ष इतके अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार आहे.

शासनाने बुलडाणा जिल्हा करिता २७ ग्रामपंचायत उदिष्टे देण्यात आलेले आहे. जिल्हास्तरीय समितीने २७ ग्रामपंचायती संबंधी प्रस्ताव शासन सादर केलेले आहे. त्यानुसार ११ ग्रामपंचायतीला दिनांक २९.३.२०१४ नुसार शासनाने मान्यता दिलेली आहे. उर्वरित १६ ग्रामपंचायतीची निवड शासन स्तरावरुन लवकरच मान्यता प्रदान होईल.

### १.२ केंद्रशासनाचे बहुल ग्रामिण क्षेत्रात अल्पसंख्याक योजना :-

केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक बहुल ग्रामिण क्षेत्रात मुलभुत / पायाभुत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी क्षेत्रविकास कार्यक्रमासाठी जिल्हातील बुलडाणा, चिखली, खामगांव, शेगांव याच तालुक्याचे शासन स्तरावरुन निवड झालेली आहे. प्रत्येक तालुक्याकरिता करिता रुपये १०.०० कोटी रुपयाचे DPR तयार करणेबाबत सुचना आहेत. परंतु केंद्रशासनाने मौजे घाटपुरी येथे तत्रनिकेंतन विद्यालयात अल्पसंख्याक मुलीसाठी ४.१९ कोटी रुपयाचे वस्तीगुह मंजुर झाल्याचे कळविल्याने खामगांव प.स. चा प्रस्ताव ५.९६ कोटी रुपयाचे घेण्याचे जिल्हास्तरीय समितीने सुचविले आहे. त्याप्रमाणे जिल्हाधिकारी ३५.९९ कोटी रुपयाचे प्रस्ताव शासनास पाठविण्यात आलेले आहे.

### १.३ केंद्रशासनाचे बहुल गट क्षेत्रात अल्पसंख्याक योजना :-

केद्रशासनाच्या अल्पसंख्याक बहुल ग्रामिण क्षेत्रात गावाना समाविष्ट करण्यासाठी अल्पसंख्याक समाजाची लोकसंख्या एकुण लोकसंख्याच्या ५०% लोकसंख्या असलेल्या गावाचा बहुल गटात समाविष्ट कराण्यासाठी सुचित केलेले आहे.

त्यानुसार जिल्हयामध्ये मोताळा, सि.राजा, नादुरा या पंचायत समिती मध्ये बहुल गट तयार होत असल्याचे प्रस्ताव प्राप्त झाले त्यानुसार मा. जिल्हाधिकारी यांचे कडे सादर केलेले आहे.